मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



अग्नि
पुरुष

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Lazarus; Alastair Paterson

रूपान्तरकार: E. Frischbutter

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2021 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

इस्त्राएलसाठी काहीच चांगले दिसत नव्हते. राजा राणी परमेश्वर देवाचा व्द्ेष करित होते. कित्ती वाईट कित्ता ! लवकरच प्रजेने देखिल जिवंत देवाला सोडून दिले आणि ते मुर्तिपुजा करु लागले.



त्यांच्यातील कोणी देवावर प्रीति करीत होते का? होय, त्यांच्यात काही विश्वासू भक्ति करणारे लोक होते. एके दिवशी परमेश्वर देव त्यांच्यातील एलिया नावाच्या मनुष्याशी बोलला.



एलियाने दुष्ट अहाबाला
म्हटले, "इस्त्राएलाचा
देव परमेश्वर याच्या
जीविताची शपथ,
जी वर्षे आता
येणार त्यांत दहिवर
अथवा पर्जन्य पडणार
नाही; हे सर्व माझ्या
सांगण्याप्रमाणे
होईल."

याचा अर्थ दुष्काळ !
त्याचे लोक इस्त्राएल
यांना परमेश्वर देवाने
अधिक दुष्टतेत
सरसावू
दिले नाही.

राजाला
चेतावणी
दिल्यावर, देवाने
एलियाला त्या देशातील एका एकांत ठिकाणी पाठविले.
तेथे, ओहोळा जवळ, एलिया वाट पाहात थांबला.

त्याला अन्न पुरविण्यासाठी देवाने कावळे पाठविले. त्यांनी सकाळ संध्याकाळ भाकर व मांस आणले. आणि त्या ओहोळातून एलिया पाणी पित असे.



त्या देशात पाऊस पडत नसल्यामुळे, लवकरच तो ओहोळ सुकून गेला. देवाचा शब्द खरा ठरत होता. संपूर्ण देशात पाण्याची उणीव भासू लागली.



शेतात
पिक येत
नव्हते. लोकांची उपासमार होत होती. ओहोळाचे पाणी
देखिल सुकून गेले म्हणून आता माझे कसे होईल असे
एलियाला वाटून त्याने आश्चर्य केले असावे.

परमेश्वर देवाने एलियाला म्हटले, "उठ, सारफथ गावात जाऊन राहा. पाहा, तुझे पोषण करण्याची तेथल्या एका विधवेस मी आज्ञा केली आहे." देवाला त्याच्या सेवकांच्या गरजा माहित असतात. परंतू

पुरवठ्याचा मार्ग किती विचित्र होता.

नम्रतेपुर्वक एलियाने देवाचे आज्ञापालन केले. जेंव्हा तो सारफथ गावाच्या वेशीजवळ आला तेंव्हा एका विधवा

स्त्रीला सरपण गोळा करतांना त्याने पाहिले.

तिला हाक मारुन तो म्हणाला, "मला एका पात्रात प्यावयास थोडे पाणी घेऊन ये." ती पाणी आणावयास जात असतां तो तिला म्हणाला,

"आपल्या हाती एक भाकरीचा तुकडा मला घेऊन ये." ती म्हणाली, "मडक्यांत मूठभर पीठ आणि कुपीत थोडेसे तेल ऐवढेच आहे."

दुःखाने त्या बाईने त्या संदेष्ट्याला सांगितले की, त्यांच्याजवळ आहे ते जेंव्हा संपून जाईल, त्यानंतर ते उपासमाराने मरुन जातील.

एलिया तिला म्हणाला, "भिऊं नको, तूं जा आणि म्हणतेस त्याप्रमाणे कर. पण त्यापूर्वी माझ्यासाठी एक लहानशी भाकर भाजून आण, नंतर आपल्यासाठी व आपल्या मुलासाठी भाज." "परमेश्वर पृथ्वीवर पर्जन्यवृष्टि करील त्या दिवसापर्यंत तुझे पिठाचे मडके रिकामे होणार नाही आणि तेलाची कुपी आटणार नाही."



असे घडण्यासाठी देवाला चमत्कार करावा लागेल.
आणि त्याने केला ! त्या बाईने आणि तिच्या मुलाने
पुष्कळ दिवस पर्यंत त्यातून खाल्ले, तरी पिठाचे मडके
रिकामे झाले नाही, किंवा तेलाची कुपी आटली नाही.



एलिया त्यांच्या संगती राहिला. एके दिवशी दुःखाची गोष्ट घडली. त्या विधवेचा मुलगा मरण पावला. एलियाने त्या मुलाचे शरीर माडीवरच्या घरात नेले.



त्याने देवाकडे आग्रहाची अशी प्रार्थना केली, "हे माझ्या प्रभू देवा, मी अशी प्रार्थना करतो की या बालकाचा प्राण त्याच्या ठायी पूर्ववत् येऊ दे." किती अशक्य अशी ती प्रार्थना होती !



परमेश्वराने एलियाची प्रार्थना ऐकली आणि त्या बालकाचा प्राण त्याच्या ठायी पुर्ववत येऊन तो पुनः जिवंत झाला. जेव्हा एलियाने त्या बालकाला घेऊन त्याच्या आईच्या हवाली केले तेंव्हा ती म्हणाली, "परमेश्वराचे सत्य वचन आपल्या तोंडून निघते हे मला आता कळून आले."

तिन वर्षां नंतर, देवाने एलियाला राजाकडे परत पाठवून असे सांगितले की, "मी पृथ्वीवर पर्जन्य वृष्टी करणार आहे."

अहाबकडे जा? त्याची पत्नी ईजबेल हिने आधिच देवाच्या शंभर संदेष्ट्यांना मारुन टाकले होते. परंतू एलियाने असे म्हणत वाद घातला



नाही.
तो अहाब
राजाकडे गेला.

जेंव्हा ते दोघे भेटले, तेंव्हा एलियाने सर्व इस्त्राएल लोकांना आणि ८५० खोट्या संदेष्ट्यांना एकत्रित करण्याचे आव्हान केले. कर्मेल डोंगरावर एलियाने लोकांना सांगितले,



"जर प्रभू परमेश्वर हा देव असेल तर त्याच्या भजनी लागा."

एलियाने अर्पण करण्यासाठी दोन गोऱ्हे तयार केले परंतू विस्तव पेटवण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या आगीचा वापर करायचा नाही असे ठरले. "तुम्ही तुमच्या देवाचा धावा करा, आणि मी माझ्या देवाचा धावा करिन. आणि जो परमेश्वर अग्निच्या व्द्रारे उत्तर देईल तोच खरा देव ठरावा." सर्व लोक म्हणाले, "ठिक आहे."



सकाळ पासून तर संध्याकाळ पर्यंत खोट्या देवाचे संदेष्टे खोट्या दैवतांचा धावा करु लागले. ते उड्या मारुन नाचले, आणि रक्तबंबाळ होईपर्यंत स्वतःला घाव करुन घेतले. परंतू अग्नि आला नाही.

एलियाने अर्पण
आणि अर्पणाचे लाकडे
यांवर पाणी टाकून ते
पुर्णपणे ओलेचिंब
केले, आणि प्रार्थना
केली, "हे परमेश्वरा,
ऐक, माझी विनंती
ऐक; हे परमेश्वरा, तूंच
देव आहेस ... याची
या लोकांना जाणीव
होऊ दे."

तेव्हां
परमेश्वरापासून
अग्नी उतरला. त्याने
अर्पणाचे गोऱ्हे आणि
लाकडे ऐवढेचे नव्हे
तर वेदीचे दगड
देखिल जाळून भस्म
केले !

हे पाहून सर्व लोक पालथे पडून म्हणाले,
"परमेश्वर हाच देव ! परमेश्वर हाच देव !"
एलीया त्यांस म्हणाला, "बआलच्या
संदेष्ट्यांस पकडा; त्यांतल्या एकासहि
निसटून

जाऊ देऊ
नका."

अहाब राजाने फार आधिच जे करायला हवे होते ते एलियाने केले. त्याने खोट्या संदेष्ट्यांचा वध केला.

मग देवाच्या सेवकाने
अहाबास सांगितले, पाऊस
येत आहे. लवकरच लहानसा
ढग दिसला. तिन वर्षांपेक्षा अधिक
कालावधि पासून भयंकर

दुष्काळ पडला असतांना,
आता पाऊस
पडेल
का?

थोड्याच वेळाने, मेघ व तुफान यांहींकरुन आकाश काळेभोर झाले आणि मोठा पाऊस पडला. देवाने पाऊस पाठवला. एलिया सत्य सांगत होता हे परमेश्वराने दाखवून दिले. तोच एक मात्र खरा परमेश्वर आहे हे देवाने दाखवून दिले.

अहाब राजाने देवाचा आणि त्याचा सेवक एलिया यांचा सन्मान केला असे तुम्हांला वाटते का? नाही ! खरेतर,

ईजबेलने ऐलियाला जिवे मारण्याचा प्रयत्न केला, परंतू तो पळून गेला.

अखेरिस, अहाब एका युध्द्दात मारला गेला, आणि ईजबेलला नोकरांनी महालाच्या उंच भिंतिवरुन खाली

ढकलून दिले. खाली असलेल्या दगडांवर आपटून ती मरण पावली.

एलियाचे काय झाले? एके दिवशी परमेश्वराने अग्नी रथ व अग्नीवारु पाठविले; आणि एलिया, देवाचा अग्नि पुरुष, वावटळींतून स्वर्गास गेला.

अग्नि पुरुष

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

१ राजे १७–१९, २ राजे २

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर.
आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!

जॉन 3:16